**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 19.10.2025** **वार- रविवार**

---

**दीपावली**

दीपोत्सवाचा उत्साह पुण्यात सर्वत्र दिसत आहे. घरोघरी आकाशकंदील, पणत्या आणि दिव्यांची रोषणाई करण्यात आली आहे, फराळाचे पदार्थ आणि पक्वान्नाचा सुवास दरवळतो आहे. बाजारपेठामध्येही चैतन्याचं वातावरण असून पणत्या, रांगोळ्यांसारख्या छोट्या मोठ्या वस्तूंपासून मौल्यवान दाग दागिने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू, घरगुती उपकरणांच्या खरेदीसाठी ग्राहकांनी बाजारात गर्दी केली आहे. दिवाळीच्या निमित्ताने सर्वत्र सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही पाहायला मिळत आहे. तसंच वंचित घटकांची दिवाळी गोड करण्यासाठी अनेक सामाजिक उपक्रमांचं आयोजनही करण्यात येत आहे.

**दिवाळी पहाट**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमीच्यावतीनं आज ‘दिवाळी पहाट -दीपबंध सुरांचा’ हा भावगीत आणि भक्तीगीतांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

**दिवाळी**

पुण्यातल्या 'दुर्गम प्रतिष्ठान' संस्थेच्या वतीनं नुकतच राजगड तालुक्यातील आठरा गाव मावळ परिसरातील पिशवी, गुगुळशी, पांगारी,वरोती, केळद इथल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाना महिनाभर पुरेल अशा किराणा मालासह दिवाळी फराळ,तसंच शालेय साहित्याचं वाटप करण्यात आलं. यावेळी देण्यात आलेल्या सौर कंदिलांमुळे या वाड्या उजळून निघाल्या.

## दिवाळी

साईनाथ मंडळ ट्रस्ट आणि अजिंक्य मित्र मंडळाच्यावतीनं पुणे जिल्ह्यातल्या मुळशी तालुक्यातील कोळवण परिसरातील भालगुडी,काशिग आणि वाळेण  या गांवांमधील आदिवासी पाड्यांतील कुटुंबांना दिवाळी फराळाचं वाटप करण्यात आले.गेल्या 15 वर्षांपासून हा उपक्रम राबवला जात आहे.

## पूरग्रस्तनिधी

मराठवाड्यातील पूरग्रस्त भागातील मुलामुलींसाठी सहाय्यता निधी उभारण्यासाठी 'तीन भारतरत्न', या सांगीतिक मैफलीचं आयोजन आज पुण्यात करण्यात आलं होतं. पंडित भीमसेन जोशी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर आणि कवी अटलबिहारी वाजपेयी यांच्या गाणी, कविता आणि आठवणी या  कार्यक्रमात  सादर करण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी एक लाख 51 हजारांचा निधी उभारण्यात आला.

## अन्न औषध प्रशासन

सणासुदीच्या काळात अन्नातील भेसळीबाबत नागरिकांना शंका आल्यास त्यांनी 1800 222 365 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा किंवा नजीकच्या अन्न आणि औषध प्रशासन कार्यालयात तक्रार नोंदवावी असं आवाहन पुणे विभागाचे सहआयुक्त सुरेश अन्नपुरे यांनी केलं आहे.

## पर्यावरण स्नेही फटाके

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दर वर्षीप्रमाणे यंदा पुण्यातील गोळीबार मैदानाशेजारील धोबी घाटावर फटाक्यांच्या आवाजाची चाचणी घेण्यात आली. यामध्ये पर्यावरणस्नेही फटाक्यांची चाचणी घेण्यात आली. या चाचणीचा अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला पाठविण्यात येणार आहे. या चाचणीतील निष्कर्षांचा उपयोग भविष्यात उपाययोजना करण्यासाठी होणार आहे, असं महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे  प्रादेशिक अधिकारी  बाबासाहेब कुकडे यांनी सांगितलं.

**हास्ययोग**

नवचैतन्य हास्ययोग परिवाराचा वर्धापन दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नवचैतन्य आरोग्य संहिता या व्यायाम पुस्तिकेचं प्रकाशन करण्यात आलं.आगामी काळात हास्ययोग आनंदयात्रा काढून पुण्यामध्ये एक लाख लोकांना हास्ययोग परिवाराशी जोडण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम सुरू आहे असं मुख्य समन्वयक मकरंद टिल्लू यांनी सांगितलं.

**मोहोळ**

पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊस जमीन व्यवहार प्रकरणाशी आपला काहीही संबंध नसल्याचं केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. या प्रकरणी माजी आमदार रवींद्र धंगेकर आणि शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी मोहोळ यांच्यावर आरोप केले होते; त्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. दरम्यान या जमीन व्यवहाराला त्वरित स्थगिती द्यावी अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

**गोखले राज्यशास्त्र**

पुण्यातल्या गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतर्फे राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील रोजगार लवचिकतेवर राज्यव्यापी अभ्यास सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासाद्वारे आर्थिक वाढीच्या तुलनेत, रोजगारांमध्ये किती बदल होतो, याचा अभ्यास करून सर्वसमावेशक धोरणनिर्मितीसाठी धोरणात्मक शिफारसी केल्या जाणार आहेत. गोखले संस्थेचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. उमाकांत दास यांनी ही माहिती दिली.

**पुणे रिंगरोड**

पुणे रिंगरोडची आता नवीन ओळख निर्माण होणार आहे. त्यासाठी आठ हजारांहून अधिक झाडांचे पुनर्रोपण, पाच लाखांहून अधिक नवीन वृक्ष लागवड, टोल नाका,

बोगदा आणि रस्त्यावरील दिव्यांसाठी सौरऊर्जेचा वापर, अशा विविध माध्यमांतून 'ग्रीन कॉरिडॉर' म्हणून उदयास येणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी एमएसआरडीसीने रिंगरोड प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. या रिंगरोडची लांबी 136 किलोमीटर असून, त्यांची रुंदी सुमारे 110 मीटर इतकी असणार आहे. 2028 पर्यंत रिंगरोड पूर्ण करण्याचे उद्दिष्ट एमएसआरडीसीने ठेवले आहे.

**बाजार**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज सुमारे नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्याने भेंडी, वांगी, टोमॅटो, घेवडा यांच्या भावात घसरण झाली. खरबूज बोरे आणि सिताफळ यांचे भाव वाढले आहेत. दिवाळीमुळे झेंडू, शेवंती या पारंपरिक फुलांना मागणी आहे, चांगल्या प्रतीच्या मालाचे भाव 20 ते 30 टक्क्यांपर्यंत वाढले असून शोभिवंत फुलांची मागणीही वाढली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 33 तर किमान तापमान 20 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही कमाल तापमान 32 अंशांच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता,ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**